म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र.

IRBK-0105697

IRBK-0105697


0 JUN 1972

JUL 197

6 MAY 1975

24 FEB 1977

शेषशायी भगवान् श्रीविष्णूंनी घेतलेले



लेखक : बाळकृष्ण वामन फाटक

IRBK-0105697

IRBK-0105697

मूल्य चार आणे

# अनुक्रमणिका


१. मत्स्यावतार ... ... ... ३

२. कूर्मावतार ... ... ... ६

३. वराहावतार ... ... ... ८

४. नरसिंहावतार ... ... ... ११

५. वामनावतार ... ... ... १५

६. परशुरामावतार ... ... ... १८

७. रामावतार ... ... ... २२

८. कृष्ण ... ... ... २५

बौद्धावतार ... ... ... २९

१०. कलंकी-आवतार ... ... ... ३१



मुद्रक : के. एल्. एन्. राव, : मुंबई वैभव प्रेस : मुंबई नं. ४

प्रकाशक : ग. का. रायकर : झावबाची वाडी : मुंबई नं. २

प्रथमावृत्ति : १ ऑगस्ट १९५१

तृतीयावृत्ति : १ जानेवारी १९५४

चतुर्थावृत्ति : २६ जानेवारी १९५६

# मत्स्यावतार



फार पूर्वींची गोष्ट. रवीचा पुत्र मनुराजा हा आपल्या मुलावर राज्याचा भार सोंपवून तप आचरण्यासाठीं वनांत गेला. दीर्घकालपर्यंत तप केल्यावर भगवान ब्रह्मदेव प्रसन्न झाले व " वर माग " असें म्हणाले. राजा म्हणाला, " प्रभो, प्रलयकाळ प्राप्त झाला असतां चराचर सर्व प्राणिमात्रांचें रक्षण करण्याचें सामर्थ्य मला प्राप्त व्हावें; एवढें एकच माझें मागणें आहे. "

" तथास्तु ! " म्हणून ब्रह्मदेव अंतर्धान पावले.

मनु राजाची ही परोपकार-बुद्धि पाहून स्वर्गलोकाहून देवांनीं त्याच्यावर पुष्पवृष्टि केली.

पुढें एकदां हा मनुराजा आपल्या आश्रमांत बसून पितरांचें तर्पण करीत असतां एकाएकीं एक लहान मासा त्याच्या हातांत पडला. त्याची दया येऊन राजानें त्याला कमंडलूतील पाण्यांत ठेवलें. तेथें तो चोवीस तासांत सोळा अंगुळें वाढला आणि " राजा, माझें रक्षण कर " असें म्हणूं लागला.

तेव्हां राजानें त्याला पाण्याच्या रांजणांत ठेवलें.

पण तेथेंही तो एका दिवसांत एक हातभर वाढून रक्षणार्थ राजाची पुन्हा प्रार्थना करूं लागला.

मग मनुराजानें त्याला विहिरींत सोडला. तेथेंही तो वाढला. पुढें सरोवरांत टाकला तेथेंही त्याची वाढ आहेच! शेवटीं समुद्रांत टाकला तेव्हां तेथेंही त्यानें आपल्या शरीरानें सर्व समुद्र व्यापून टाकला!!

आतां मात्र राजाला अतिशय आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, "खरोखर तूं कोणी राक्षस असावास नाहींतर साक्षात् परमेश्वर वासुदेव तरी असावास. एरवीं एवढें प्रचंड स्वरूप धारण करण्याचें सामर्थ्य दुसऱ्या कुणाचें आहे?"

भगवान परमेश्वरच असणार असें समजून मनुराजानें त्याला नमस्कार केला. तेव्हां मत्स्यरूपी भगवान म्हणाले, "राजा, तुझा तर्क बरोबर आहे. या पृथ्वीवर लवकरच जलप्रलय व्हावयाचा आहे. सर्व अनाथ जीवांच्या रक्षणार्थ देवांनीं एक नौका तयार केली आहे. तींत स्वेदज, उद्भिज, वगैरे जीव घालून ती नौका माझ्या शिंगाला बांध म्हणजे प्रलयानंतर तूंच या जगाचा स्वामी होशील." असें सांगून तो मत्स्य अंतर्धान पावला.

पुढें एके दिवशीं मोठा प्रलय झाला तेव्हां मत्स्यरूपी भगवंताचें मनुराजानें चिंतन केलें असतां एक नाव आली. मनुराजानें तिजमध्यें औषधी बीजें व सप्तर्षि यांसह प्रवेश केला. सप्तर्षि म्हणाले, "हे राजा! तूं केशवाचें ध्यान कर. तोच आमचें ह्या संकटापासून रक्षण करून आम्हांस सुखी करील."

राजानें ध्यान केलें तेव्हां सोनेरी रंगाचा व लक्ष योजनें विस्तीर्ण असा एक शिंगाचा मासा त्या महासागरामध्यें प्रगट झाला. त्याला पाहिल्यावर पूर्वी सांगितल्याप्रमाणें राजानें वासुकीची दोरी करून त्या मत्स्याच्या शिंगाला ती नाव बांधिली."

नंतर ह्या मत्स्यरूपी परमेश्वरानें सागराचा पुत्र शंखासूर याच्याशीं युद्ध केलें; कारण त्यानें ब्रह्मदेवाचे वेद चोरून नेले होते.

शंखासूर हा अतिशय प्रबळ राक्षस होता. तो देवांस त्रास देऊं लागला त्याची बरोबरी करणारा दुसरा कोणी पृथ्वीवर

नव्हता. एका विष्णूवांचून शंकर, ब्रह्मदेव यांसुद्धां इतर सर्व देवांना जिंकून त्यांचीं स्थानें त्यानें हिरावून घेतलीं. शंखासुराच्या भीतीनें इंद्रादि देव सुवर्ण पर्वताच्या दरींत लपून राहिले.

पण देवांना जिंकूनही आपण कांहीं मिळविलें नाहीं असें शंखासुरास वाटूं लागलें. वेद तर देवाजवळ राहिले. त्यामुळें त्यांचें कशासाठीं अडत नाहीं. पाहिजे तो पदार्थ पाहिजे तेव्हां त्यांना उत्पन्न करतां येतो. ऋषी यज्ञ-याग होमहवन करतात, त्यामुळें इंद्रादि देव तृप्त होतात. तेव्हां हे वेद हिरावून आणले म्हणजे यज्ञयाग बंद होतील व सर्व देव उपाशी मरतील.

पुढें विष्णु निद्रिस्त झाला आहे अशी संधि साधून शंखासूर सत्यलोकाला गेला. ब्रह्मदेव पळून गेल्यामुळें त्याला कोणी अडथळा करावयास नव्हतें. त्यानें मूर्तिमंत चारी वेद शोधून काढले आणि ते घेऊन तो सागरतीरास गेला. त्या दैत्याच्या भयानें चारी वेदांनीं सागरांत उडी घेतली व उदकमय होऊन ते आंत दडून राहिले. शंखासुरानें वेद नेल्याकारणानें ऋषींचीं यज्ञयागादि कर्में बंद पडलीं. तेव्हां अर्थात संपूर्ण देवांना उपास पडले. शेवटीं त्यांना उपास करण्याची ताकद राहिली नाहीं असें पाहून ब्रह्मदेवानें त्यांना श्रीहरीला शरण जाण्याची मसलत सांगितली. वैकुंठास जाऊन सर्व देवांनीं विष्णूपुढें आपलें गाऱ्हाणें मांडलें.

विष्णूनें तें सर्व ऐकून घेऊन आपण शंखासुराचा वध करूं व वेद घेऊन येऊं म्हणून आश्वासन दिलें.

आणि मग मत्स्यावतार घेऊन विष्णूंनीं आपलें वचन पुरें केलें.

नाभ्यधरोन्हितसम आकंठश्च नराकृतिः
घनःशाम चतुर्बाहुः शंकचक्रगदाधरः
शृंगिमत स्यनिभो मूर्द्धा लक्ष्मीवक्षो विराजितः
पद्मचिह्नित सर्वांगः सुंदरश्चारु लोचनः

— मेरुतंत्र

# कूर्मावतार



पूर्वकाळीं देव आणि दैत्य यांनीं समुद्रमंथन करून रत्नें काढावयाचा विचार केला. त्याप्रमाणें दोघांनीं मंदराचल पर्वताची रवी व वासुकी सर्पाचा दोरा करून समुद्राचें मंथन करण्यास आरंभ केला. देव हे शेपटीच्या बाजूनें आणि राक्षस मुखाच्या बाजूनें ओढीत होते. त्या घर्षणामुळें वासुकीच्या मुखांतून बाहेर पडलेल्या विषानें भयंकर उष्णता उत्पन्न झाली व त्या उष्णतेचा सर्वांना त्रास होऊं लागला. तेव्हां महादेवानें तें वीष प्राशन केलें. पुढें त्या समुद्रमंथनांतून, लक्ष्मी, कौस्तुभ, पारिजातक, सुरा, धन्वंतरी, चंद्रमा, रंभा, ऐरावत, अमृत, वीष, उच्चैःश्रवा अश्व, कामधेनू, शंख व हरिधनु अशीं चौदा रत्नें बाहेर पडलीं.

समुद्राचें मंथन करतांना मंदराचल पर्वत खालीं बुडूं लागला. कोणालाच उचलून धरतां येईना. अखेर देव व राक्षस भगवान विष्णूस शरण गेले. विष्णूनें त्यांचें गाऱ्हाणें ऐकून आपण तुम्हांस सहाय्य करूं असें आश्वासन दिलें.

मग विष्णूनें फारच प्रचंड असें कासवाचें रूप धारण केलें आणि आपल्या विस्तीर्ण पाठीवर तो मंदराचल पर्वत तोलून धरला. पाठीवर झालेल्या घर्षणानें कूर्माच्या म्हणजे त्या कांसवाच्या

पाठीची कंडू शमन झाली. समुद्र मंथनाचें काम पुरें झाल्यावर मिळालेल्या अमृत व सुरा यांच्या वांट्याबद्दल देवांमध्यें आणि राक्षसांमध्यें वाद सुरू झाला. दोघेही आपला हट्ट सोडीनात. शेवटीं तंटयाचा निकाल करण्यासाठीं देव व दैत्य विष्णूकडे गेले. विष्णूनें सांगितलें, कीं देवांनीं एका पंक्तीला व दैत्यांनीं एका पंक्तीला बसावें. एक स्त्री येऊन अमृत व सुरा हीं पंक्तींत वाढील. ज्याला जें मिळेल त्यानें तें ग्रहण करावें. विष्णूचा हा विचार दोघांनाही पसंत पडला. एका पंक्तीला देव व दुसऱ्या पंक्तीला दैत्य बसले.

मग भगवान विष्णु मोहिनीचें रूप घेऊन उभयतांस अमृत व सुरा वाढण्यास आले. मोहिनीचें सुंदर स्वरूप पाहून दैत्य देहभान विसरून गेले. त्यांची अशी स्थिति होतांच विष्णूनें देवांना अमृत पळवून नेण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तें देवांनीं पळवून नेलें. कांहीं वेळानंतर मोहिनीचें रूप टाकून विष्णु गुप्त झाले.

आपणांस देवांनीं फसविलें व अमृत पिऊन ते अमर झाले ही गोष्ट दैत्यांच्या ध्यानीं येतांच ते संतापले आणि त्यांनीं यापुढें देवांशीं वैर धरलें. तसेंच विष्णूच्या मदतीमुळें देवांना हें अमृत प्राप्त झालें म्हणून त्यांनीं विष्णूचाही द्वेष करावयास सुरवात केली.

★

विलोक्य विघ्नेशविधिं तदेश्वरो
दुरन्तवीर्योऽवितथोभिसंधिः ।
कृत्वा वपुः काश्यपमद्भुतं महत्
प्रविश्य तोयं गिरिमुज्जहार ॥

—भागवत

# वराहावतार



दक्ष प्रजापतीची दिती नांवाची कन्या कश्यपाला दिली होती. तिला हिरण्याक्ष व हिरण्यकशिपु असे दोन जुळे मुलगे झाले. हिरण्याक्षाला युद्धाची आवड असल्यामुळें तो एकदां आपल्या हातांत गदा घेऊन युद्ध-प्रसंग उपस्थित करण्याकरितां स्वर्गलोकीं गेला. शौर्य, शरीरबल आणि त्यांत देवांचा वर यांमुळें तो अतिशय गर्विष्ठ बनला होता. त्याला पाहून देव भयभीत झाले. इंद्रासह ते सर्व देव आपल्या तेजामुळें लपून बसले आहेत असें पाहून हिरण्याक्ष तेथून निघाला.

स्वर्गांतून निघून खोल व भयंकर गर्जना करणाऱ्या सागराजवळ हिरण्याक्ष आला. क्रीडा करावी अशा उद्देशानें त्यानें त्या अपार समुद्रांत उडी घेतली. अनेक वर्षें समुद्रांत संचार करीत असतां, वायूनें उसळणाऱ्या मोठमोठ्या लाटांना आपल्या लोखंडी गदेनें वारंवार तडाखे देत तो वरुणाच्या विभावरी नामक राजधानीस पोहोंचला. तेथें त्यानें वरुणाला युद्धाचें आह्वान दिलें. तेव्हां वरुणानें म्हटलें, "हे राक्षसश्रेष्ठा ! तूं युद्धकलेंत निष्णात आहेस. तुझ्याबरोबर युद्ध करून तुझें समाधान करणारा पुराणपुरुषावांचून दुसरा कोणी नाहीं. तूं त्याच्याकडे जा."

वरुणाचें हें भाषण ऐकून हिरण्याक्षाला फार आनंद झाला. त्यानें नारदाकडून तो भगवान आदिवराह कोठें आहे तें समजून

घेतलें आणि मोठ्या त्वरेनें तो रसातळांत शिरला. तेथें अजिंक्य असा वराहरूपी भगवान आपल्या दाढेच्या टोंकावर पृथ्वी धारण करून तिला वर घेऊन येत आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. "हा तर अरण्यांत रहाणारा पशु आहे!" असें म्हणून हिरण्याक्षानें त्याचा उपहास केला व म्हटलें, "हे मूर्खा! इकडे ये आणि ह्या पृथ्वीला सोडून दे. विश्वकर्म्यानें आम्हां पाताळवासी लोकांना ही पृथ्वी दिलेली आहे. अधम देवा! तूं वराहाचें शरीर धारण केलेलें आहेस. मी पहात असतां हिला घेऊन जाशील तर तुझें कल्याण होणार नाहीं. अरे आमचे शत्रू जे देव त्यांनीं तुला आम्हां दैत्यांच्या नाशाकरितां पोसलें आहे काय! तूं दृष्टिआड राहूनच दैत्यांना जिंकीत असतोस. वास्तविक हा तुझा पराक्रम क्षुद्र आहे. मी आत्तांच तुला मारून टाकतों."

हिरण्याक्षाचें हें भाषण वराहरूपी परमेश्वराच्या हृदयास झोंबलें. परंतु त्यानें आपल्या दाढेच्या अग्रावर असलेली पृथ्वी भ्यालेली आहे असें पाहून ते तीक्ष्ण वाक्प्रहार मुकाट्यानें सहन केले. तो वराहरूपी विष्णु पृथ्वीला घेऊन पाण्यांतून बाहेर पडत असतां हिरण्याक्ष त्याच्या मागें लागलाच होता.

त्या आदिवराहानें त्याच्याकडे लक्ष न देतां पूर्वीप्रमाणें उदकावरील योग्य स्थळीं पृथ्वीला बसवून तिच्यामध्यें आपली शक्ति स्थापन केली. त्यावेळीं हिरण्याक्षासमक्ष ब्रह्मदेवानें आदिवराहाची स्तुती केली आणि देवांनीं त्यावर पुष्पवृष्टि केली.

इकडे हिरण्याक्ष वराहावर गदा प्रहार करीतच होता. त्याला वराहरूपी विष्णूनें म्हटलें, "अरे, आम्ही रानांत फिरणारे पशूच आहों पण तुझ्यासारख्या कुत्र्यांना शोधीत आहों. हे पहा आम्ही रसातळवासी लोकांची ठेव पळवून नेत आहों. तुला काय करावयाचें असेल तर युद्धास सिद्ध हो."

हें ऐकून हिरण्याक्ष वराहाच्या अंगावर धांवून गेला. त्यानें आपली गदा त्याच्या अंगावर फेकली. वराहानें तो वार चुकविला. हिरण्याक्षानें ती गदा पुन्हा उचलून घेतली आणि ती गरगरां

फिरवीत तो रागानें दांत ओंठ खाऊं लागला. इतक्यांत भगवंतानेंही संतापून त्याच्यावर उडी मारली. भगवान वराहानें आपल्या गदेनें शत्रूच्या उजव्या भुंवईवर प्रहार केला. अशा रीतीनें हे दोघे थोर वीर हातघाईवर आले. वराह व हिरण्याक्ष यांच्यामध्यें पृथ्वीच्या स्वामित्वासाठीं स्पर्धा सुरू झाली. परस्परांच्या कठोर गदाप्रहारांनीं एकमेकांचीं शरीरें ठेंचून निघालीं.

हें भयंकर युद्ध पाहाण्यासाठीं ब्रह्मदेव ऋषिमंडळीसह तेथें आला. त्याला दिसून आलें कीं, हिरण्याक्षाचें शौर्य मोठें असून त्याला भीति कशी ती मुळींच वाटत नाहीं. तसेंच भगवंतांनीं योजिलेल्या प्रत्येक युक्तीचा तो प्रतिकार करीत असून त्याच्या पराक्रमाचा नाश करणें कठीण आहे.

तेव्हां ब्रह्मदेवानें म्हटलें, " देव, ब्राह्मण, गायी व निरपराध प्राणी यांचा हा दैत्य छळ करतो आणि त्यांना भय दाखवून त्यांची संपत्ति व प्राण हरण करतो. देवा ! हा कपटी व दुष्ट आहे. याला अनुकूल अशी संध्याकाळची वेळ प्राप्त झाली नाहीं तत्पूर्वी आपण आपल्या देवमायेचा अवलंब करून या दैत्याचा वध करा."

ब्रह्मदेवाचें हें भाषण ऐकून भगवंतानें स्मित केलें आणि त्या राक्षसाच्या हनुवटीवर आपल्या गदेनें प्रहार केला.

त्यानंतर या दोघांचें गदा, त्रिशूल वगैरेंनीं भयंकर युद्ध झालें. शेवटीं त्यांच्यांत मुष्टियुद्ध सुरू झालें. भगवंतांनीं आपल्यावर मुष्टिप्रहार करणाऱ्या हिरण्याक्षाच्या कानशिलांत मारली. त्या सरशीं वाऱ्यानें वृक्ष मोडावा तसा तो खालीं पडून मरण पावला.

ततः संरक्तनयनो हिरण्याक्षो महासुरः ।
कोऽयंत्विति वदन् रोषान्नारायणमुदैक्षत ॥
वाराहरूपिणं देवं स्थितं पुरुषविग्रहं ।
शंखचक्रोद्यतकरं देवानामार्तिनाशनं ।
रराज शंखचक्राभ्यां ताभ्यामसुरसूदनः ।
सूर्याचंद्रमसोर्मध्यें पौर्णमास्यामिवांबुदः ॥

—अग्निपुराण

★

# नरसिंहावतार



आपल्या भावाला, हिरण्याक्षाला, विष्णूनें वराहरूपानें ठार मारलें हें ऐकून हिरण्यकशिपूला अतिशय राग आला. पण नुसता राग येऊन उपयोग काय? भगवान विष्णू पुढें आपलें कांहीं चालत नाहीं तेव्हां तप करून सामर्थ्य प्राप्त करून घ्यावयाचें असें त्यानें ठरविलें.

मंदार पर्वतावर जाऊन त्यानें उग्र तप आरंभिलें. त्याच्या त्या शंभर वर्षांच्या घोर तपानें ब्रह्मदेव प्रसन्न झाले. त्यांनीं म्हटलें, " हिरण्यकशिपु, हवा तो वर मागून घे. "

तेव्हां हिरण्यकशिपु म्हणाला, " हे प्रजापति! आपण खरोखरच प्रसन्न झालां असाल तर मी मागतों तो वर द्याल काय?"

" मी एकदां देतों म्हटल्यावर शंका कशाला?"

"ठीक तर." हिरण्यकशिपूनें म्हटलें, घरीं किंवा दारीं (म्हणजेच घराबाहेर) दिवसां अगर रात्रीं, मनुष्याकडून किंवा पशुकडून, शस्त्रानें किंवा अस्त्रानें, सजीवाकडून किंवा निर्जिवाकडून जमिनीवर किंवा पाण्यावर मला कधीं मृत्यु येऊं नये."

हें ऐकून ब्रह्मदेव म्हणाले, "तूं मागतोस तसा वर आजवर कुणालाहीं मिळालेला नाहीं. पण देतों म्हटलं आहे तेव्हां मी तूं मागितलास तसाच तुला वर देतों."

हें ऐकून मात्र हिरण्यकशिपूला दोन बोटें स्वर्ग उरल्यासारखें झालें. आतां मला कुणाचीही भीति बाळगायला नको. आतां त्या विष्णूला ठार करून मी माझ्या भावाचा सूड घेणार असा त्यानें मनांत विचार केला.

बोलून चालून राक्षस आणि कुणाच्याही हातून मरण येणार नाहीं हा वर. मग काय, हिरण्यकशिपूच्या मदोन्मत्तपणाला तुसता भर आला. त्यानें तिन्ही लोक जिंकले, देवांचा पराभव केला, गंधर्वांना हरविलें आणि देवांचा राजइंद्र याला हांकलून लावून त्याच्या सिंहासनावर बसून तो राज्य करूं लागला.

परंतु हिरण्यकशिपूच्या मनांत एक गोष्ट सलत होती.

त्याचा हाडवैरी विष्णु याचें पारिपत्य करावयाचें राहिलें होतें. त्याचा नाश करावयाचा राहिला होता.

सर्वत्र हिरण्यकशिपूचा जयजयकार होत होता, विष्णूचें नांवहि उच्चारणाऱ्याला कडक शिक्षा होत असे. बाहेर विष्णूच्या नांवाला बंदी असतांना हिरण्यकशिपूच्या घरांतच एक विष्णूचा भक्त निर्माण झाला होता. तो म्हणजे त्याचा स्वतःचा मुलगा प्रल्हाद. अर्थात ही गोष्ट हिरण्यकशिपूला सहन होणें शक्य नव्हतें. त्यानें म्हटलें, "प्रल्हाद! माझ्या घरांत विष्णूचं नांव निघतां कामां नये."

"कां बाबा?" प्रल्हादानें विचारलें.

"कारण तो आमचा वैरी आहे."

"तो परमेश्वर कशाला कुणाशीं वैर करील?"

" तूं लहान आहेस. अरे त्यानं आपल्या राक्षस कुळाचा नाश केला. त्यानं तुझ्या काकाला—हिरण्याक्षाला ठार केलं. मी देखील विष्णूला ठार करणार आहे."

"पण बाबा विष्णू दुष्टांचा नाश करतो व सुष्टांचं पालन करतो."

"गप्प बस कारट्या! मला शहाणपणा शिकवूं नकोस. पुन्हा या घरांत विष्णूचं नांव ऐकूं आलं तर तुझी जीभच उपटून टाकीन."

पण या सांगण्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. प्रल्हादाची विष्णूभक्ति वाढतच चालली. तेव्हां उंच पर्वतशिखरावरून प्रल्हादाचा कडेकोट करण्याची हिरण्यकशिपूनें सेवकांना आज्ञा दिली. प्रत्यक्ष भगवान विष्णू त्याच्या रक्षणास धांवून आले. त्यांनीं त्याला एकाद्या फुलाप्रमाणें झेलून वांचविलें. प्रल्हादाची विष्णूभक्ति आणखी उफाळून निघाली.

यावर हिरण्यकशिपूनें प्रल्हादास वीष पिण्यास दिलें. 'नारायण' 'नारायण' म्हणत तो तें वीष प्याला, त्याला विषाचीही बाधा झाली नाहीं.

रोजच्या रोज प्रल्हादाचें नारायणस्मरण जोराजोरांत चालत होतें. तो एकटाच काय, पण राज्यांतील आणखीही अनेक मंडळींनीं त्यांच्यासारखेंच व्हायला सुरवात झाली होती.

ज्याचें नांवही उच्चारणारी जीभ तत्काळ उपटून काढण्यांत आली असती त्या विष्णूचें नांव सारखें हिरण्यकशिपूच्या कानांवर पडत होतें. त्याच्या रागाला सीमा राहिली नाहीं. एके दिवशीं प्रल्हाद होता तेथें तो आला आणि त्यानें कडाडणाऱ्या आवाजांत विचारलें, " कुठं आहे तुझा तो नारायण ?"

" तो नाहीं कुठं ?" प्रल्हाद शांतपणें उत्तरला, " परमेश्वर सर्वत्र भरलेला आहे. तो सर्वत्र वास करतो. तो इथं आहे, तिथं आहे, सर्व ठिकाणीं आहे."

" काय, सर्वत्र आहे ? मग तो या खांबांतही आहे काय ?"

" हें काय विचारायला पाहिजे ?" प्रल्हादानें हंसत म्हटलें.

"अस्सं ! पहातोंच तर तुझा परमेश्वर कुठं आहे तो !" म्हणत हिरण्यकशिपूनें खांबावर लाथ हाणली.

त्या सरशीं सर्व जग हादरून जाईल असा आवाज झाला आणि ताडकन् तो खांब दुभंग पावून त्यांतून एक विलक्षण दिसणारी आकृति बाहेर पडली.

हिरण्यकशिपूनें त्या आकृतिकडे चमकून पाहिलें. ती आकृति ना नर ना सिंह अशी विचित्र होती. ती आतां आपल्या अंगावर झडप घालणार असें पाहिल्यावर हिरण्यकशिपूनें आपलें सर्व बळ एकवटलें आणि मोठ्या त्वेषानें तो नरसिंहावर चालून गेला.

दोघांची चांगलीच जुंपली. शेवटीं त्या नरसिंहानें हिरण्यकशिपूला उचललें आणि त्याला घेऊन तो दाराच्या उंबरठ्यावर बसला आणि त्याला आपल्या मांडीवर आडवा घालून आपल्या तीक्ष्ण नखांनीं नरसिंहानें त्याचें पोट फाडून त्याची आंतडीं बाहेर काढलीं.

हिरण्यकशिपूला मारलें ती वेळ संधिकाळची होती; म्हणजे सूर्य मावळला होता, पण रात्र झाली नव्हती. उंबरठ्यावर मारलें म्हणजे घरांत नाहीं व घराबाहेरही नाहीं. प्रगट झालेली आकृति मनुष्याची नव्हती. नखानें मारलें म्हणजे शस्त्रानेंही नाहीं वा अस्त्रानेंही नाहीं. अशा रीतीनें ब्रह्मदेवाच्या वराबाहेर न जातां विष्णूनें त्या मदोन्मत्त राक्षसाचा नाश केला व आपल्या भक्तांची त्याच्या छळांतून मुक्तता केली.

सिंहस्य कृत्वा वदनं मुरारिः
सदा करालं च सुरक्त नेत्रः ।
अर्धं वपुर्वै मनुजस्य कृत्वा
ययौ सभां दैत्यपतेः पुरस्तात् ॥

★

—अग्निपुराण




कश्यपूच्या कुळांत प्रल्हादाचा नातू बळी हा एक बलाढ्य राजा होऊन गेला. तो भ्रगुकुलोत्पन्न शुक्राचार्यांचा शिष्य झाल्यामुळें त्याला असामान्य सामर्थ्य प्राप्त झालें. बळीनें इंद्रपुरी जिंकून सर्व त्रैलोक्य वश करून घेतलें. बळीची कीर्ति सर्वत्र पसरली. तो उदार अंतःकरणाचा असून त्याच्या दरबारांतून कुणीही याचक विन्मुख होऊन गेला नाहीं.

ब्राह्मणश्रेष्ठ शुक्राचार्यांनीं दिलेल्या संपत्तीचा बळीराजा असा आनंदानें उपभोग घेत असतां इकडे देवमाता अदिती फार दुःखी झाली. इंद्रादि पुत्र दिसेनासे झाले व दैत्यांनीं स्वर्गलोक बळकावला हें पाहून देवमाता अदिती अनाथाप्रमाणें दुःख करूं लागली. तेव्हां कश्यप मुनीनीं तिला विश्वपालक भगवंताची भक्ति करण्यास सांगितलें. तिच्या भक्तीनें भगवान विष्णु प्रसन्न झाले असतां तिनें वर मागितला कीं, असुरांनीं माझ्या पुत्रांचें राज्य व यज्ञभाग हरण केले आहेत ते परत मिळावे.

तेव्हां भगवान म्हणाले, "मी तुझ्या गर्भी अवतार घेऊन देवांच्या शत्रूंचा संहार करीन. तूं आतां अधिक कष्ट करूं नकोस."

पुढें यथाकाळीं तो परमेश्वर आदितीच्या ठिकाणीं प्रगट झाला. त्याची अंगकांती वर्षाऋतूंतील मेघांप्रमाणें असून डोळे प्रदिप्त होते. त्याची शरीराकृति ठेंगू होती. बटुस्वरूप धारण केलेल्या त्या

भगवंताला पाहून आनंदित झालेल्या महर्षींनीं कश्यपांकडून त्याचे जातकर्मादि संस्कार करविले. मग वामन बळीच्या यज्ञस्थानीं गेले.

यज्ञस्थानीं आलेल्या त्या बटूस पाहून बळीनें म्हटलें, " हे बटो ! तूं मजपासून कांहींतरी मागावयास आला आहेस असा माझा तर्क आहे. तरी मी तुला काय देऊं तें सांग. "

तेव्हां प्रसन्न झालेल्या बटूनें म्हटलें, हे "दैत्याधिपते ! माझ्या पावलांनीं मोजलेली तीन पांवलांइतकीच अल्पभूमि मी मागून घेतों. गरज लागेल तेवढ्याचाच स्वीकार ज्ञानी पुरुषानें करावा म्हणजे त्याला पातक लागत नाहीं. "

यावर बळी बोलला, " हे ब्राह्मणपुत्रा ! तुझें भाषण वृद्धांनाही संमत होईल असेंच आहे. तथापि तूं अल्पवयी असल्यामुळें स्वतःच्या कार्यांविषयीं अडाणी माणसाप्रमाणें पोरकटच दिसतोस. याचनेकरितां माझ्याजवळ आलेल्या पुरुषाला पुन्हां याचना करण्याचा प्रसंग येणें योग्य नाहीं. यास्तव अरे मुला ! तुझी उपजीविका चालेल एवढी तरी भूमि मागून घे. "

" राजा ! " वामनानें म्हटलें, "दैवानें प्राप्त झालेल्या वस्तूनें संतुष्ट होणाऱ्या ब्राह्मणाचें तेज वृद्धिंगत होतें. यासाठीं हे वरदश्रेष्ठ राजा ! मी तुझ्यापासून केवळ तीन पावलेंच भूमि मागतों व तेवढ्यानेंच मी कृतार्थ होईन. "

" बरें, तुझ्या इच्छेला येईल तेवढेंच घे. " असें म्हणून बळीराजानें हातांत पाण्याचें भांडें घेतलें.

इतक्यांत ज्ञानी पुरुषांत श्रेष्ठ अशा शुक्राचार्यानें बळीराजाचें सर्वस्व हरण करण्याचा विष्णूचा उद्देश आहे हें जाणून त्याला म्हटलें, " अरे बळीराजा, देवांचें कार्य साधण्यासाठीं अदितीचे पोटीं हा प्रत्यक्ष भगवान विष्णू अवतीर्ण झाला आहे. मायेनें ब्राह्मणरूप धारण करून आलेला हा श्रीहरी तुझें स्थान, ऐश्वर्य, संपत्ति, तेज व जगप्रसिद्ध कीर्ति हरण करील. हा विश्वरूप होऊन फक्त तीनच पावलांनीं हे तिन्ही लोक व्यापून टाकील. हे मूढा ! विष्णूला सर्वस्व अर्पण करून तूं आपला निर्वाह कसा करणार !"

हे बोलणें लक्षपूर्वक ऐकून बळीनें म्हटलें, "ब्राह्मणास देतों असें वचन देऊन एखाद्या वंचकाप्रमाणें केवळ द्रव्यलोभानें देत नाहीं असें मी कसें म्हणूं? असत्याहून मोठा अधर्म नाहीं. म्हणून या ब्राह्मणाची इच्छित गोष्ट मी त्याला अर्पण करणारच."

बळीराजा आपलें ऐकत नाहीं असें पाहून "तूं लवकरच ऐश्वर्यभ्रष्ट होशील." असा शुक्राचार्यांनीं बळीला शाप दिला.

शापाची पर्वा न करतां बळीनें वामनाचें पूजन करून त्याला उदकपूर्वक पृथ्वीचें दान केलें.

दानाचें उदक हातावर पडतांच बटु वामनाचें शरीर विस्तीर्ण होत चाललें आणि वामनानें बळीस म्हटलें, "हे असुरा, तूं मला तीन पावलें भूमि दिली आहेस, त्यापैकीं दोन पावलांनीं मी तुझी सर्व पृथ्वी व्यापून टाकली. आतां तिसऱ्या पावलाची काय ती व्यवस्था कर. आतां देतों म्हणून सांगितलेलें तिसरें पाऊल देतां येत नसेल तर तुला नरकांत वास करणें अवश्य आहे.

यावर बळी म्हणाला, "हे देवश्रेष्ठा! तुला मी दिलेलें वचन खोटें होत आहे असें जर तुला वाटत असेल तर मी माझें वचन खरें करून माझ्या हातून तुझी फसवणूक होणार नाहीं असें करतों. तूं आपलें तिसरें पाऊल माझ्या मस्तकावर ठेव."

बटु वामनानें त्यप्रमाणें करून बळीला पाताळांत घातलें आणि त्याला सांगितलें कीं, तूं दिलेल्या दानामुळें तुला एक कल्पप्रमाण आयुष्य मिळेल व सावर्णी मन्वंतरांत तुला इंद्रपद प्राप्त होईल. तोंवर तूं पाताळाचें ऐश्वर्य भोग."

★

श्रीवत्सकौस्तुभोरस्कं पुर्णेंदुसदृशं द्युतिम् ।
सुंदरं पुंडरीकाक्षं अतिखर्वतरं हरिम् ।
बटुवेशधरं देवं सर्ववेदांत गोचरम् ॥
मेखलाजिन दंडादि चिन्हेनांकित मिश्वरं ॥
तं दृष्ट्वा देवताः सर्वाः शतक्रतुपुरोगमा ।
स्तुत्वा महर्षिभिःसार्धं नमश्चक्रुर्महौजस । —पद्मपुराण

: ६ :

# परशुरामावतार



दैत्यांचा राजा कार्तवीर्य अर्जुन फार मोठा पराक्रमी क्षत्रिय होता. त्यानें नारायणाचा अंशावतार जो दत्त त्याची सेवा करून त्याला प्रसन्न करून घेतलें. त्याच्यापासून अर्जुनानें हजारबाहू आणि शत्रूपासून अजिंक्यपण यांची प्राप्ति करून घेतली. दत्तप्रसादानें त्याला सुवर्णाचें विमान प्राप्त झालें. वरानें प्राप्त झालेल्या दिव्य रथांतून तो महापराक्रमी वीर वारंवार देव, यक्ष आणि ऋषी यांचा संहार करून इतर सर्व भूतमात्रांस पीडा देत असे.

तेव्हां देव व महाव्रत ऋषी सत्य पराक्रमी देवाधिदेव विष्णूकडे गेले व हात जोडून म्हणाले, " हे प्रभु ! प्राणीमात्राचें रक्षण करणें हें आपलें ब्रीद, त्या प्राणिमात्रांचा छळ आणि नाश कार्तवीर्य अर्जुन करीत आहे. फार काय त्यानें इंद्राचाही पराभव केलेला आहे. त्याचें पारिपत्य आपणावांचून कुणी करूं शकत नाहीं."

देवांची ही प्रार्थना ऐकून भगवान विष्णूनें इंद्राशीं कार्तवीर्याचा नाश करण्याचा संकेत केला.

पुढें जमदग्नि नांवाच्या ऋषीची पत्नी रेणुका हिच्या पोटीं पांचवा पुत्र झाला तो राम. हाच परमेश्वराचा सहावा अवतार होय. याला परशुराम म्हणतात.

एकदां सहस्रार्जुन अरण्यांत मृगया करीत असतां जमदग्नीच्या आश्रमांत आला. जमदग्नीनें त्याचें योग्य तें आदरातिथ्य केलें. तपश्चर्या हेंच जमदग्नीचें सर्वस्व होतें. पण त्याच्यापाशीं कामधेनु

असल्यामुळें त्याला कांहीं अडचण पडली नाहीं. वीर्यशाली अर्जुनाला आपल्या वैभवाला मागें सारील असें हें मुनीचें ऐश्वर्य पाहून मत्सर उत्पन्न झाला आणि कामधेनूचा अभिलाष उत्पन्न झाल्यामुळें जमदग्नीनें केलेल्या सत्कारानें त्याला आनंद झाला नाहीं. त्यानें आपल्या सैनिकांना कामधेनूचें हरण करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें ते त्या गायीला वासरांसह ती ओरडत असतांही माहिष्मती नगरीला घेऊन गेले.

परशुराम त्यावेळीं तेथें नव्हता. तो आश्रमांत आल्यावर हें अत्याचाराचें वृत्त ऐकून फार रागावला. मग आपली तीक्ष्ण कुऱ्हाड, भाते, धनुष्य आणि ढाल घेऊन तो सहस्रार्जुनावर चाल करून गेला. त्याला आलेला पाहून आपलें चतुरंग सैन्य अर्जुनानें त्यावर सोडलें. मनाप्रमाणें वेगवान् व वायूप्रमाणें सामर्थ्यवान् असा तो राम आपल्या परशूनें शत्रुसैन्याचा नाश करीत चालला.

आपल्या सैन्याचा नाश होता आहेसें पाहून अर्जुन स्वतः रामावर चाल करून आला. आपल्या सहस्रबाहूंनीं एकाच वेळीं त्यानें पांचशें बाण सोडले, 'पण एका धनुष्यानें बाण सोडून रामानें ते सर्व तोडून टाकले. मग रामानें तीक्ष्ण धारेच्या कुऱ्हाडीनें त्याचे सहस्र बाहू तोडून टाकले व शीरही खालीं पाडलें. कार्तवीर्य अर्जुन मरून पडला. त्याचे सहस्र पुत्र पळून गेले.

मग कामधेनु सोडवून आणून रामानें बापाच्या स्वाधीन केली. आपल्या पराक्रमाची हकीगत त्यानें बापास सांगितली तेव्हां जमदग्नि म्हणाला, 'तूं पराक्रमी खरा, पण ज्याच्या शरीरांत सर्व देवांचें वास्तव्य असतें अशा राजाला तूं व्यर्थ मारलेंस. आपण ब्राह्मण असून क्षमा हेंच आपलें भूषण आहे. क्षमेमुळेंच आपण सर्वांच्या बहुमानाला पात्र झालों आहों. मूर्धाभिषिक्त राजाचा वध करणें हें ब्राह्मणवधापेक्षांही मोठें पाप आहे. यास्तव भगवंताकडे चित्त लाऊन तीर्थयात्रा कर व आपलें पाप धुवून काढ."

बापाच्या आज्ञेप्रमाणें परशुरामानें एक वर्ष तीर्थाटण केलें आणि मग तो आश्रमाला परतला. पुढें एके दिवशीं त्याची आई रेणुका

गंगेवर गेली असतां तेथें गंधर्वांचा राजा चित्ररथ अप्सरांसह जलक्रीडा करीत होता; त्याला पाहून तिच्या मनांत अभिलाषा उत्पन्न झाली आणि घरीं अग्नीला आहुती देण्याची वेळ झालेली आहे या गोष्टीचें तिला भानही राहिलें नाहीं. पण मग आपणांस उशीर झालेला पाहून जमदग्नीचा आपल्यावर राग होईल या भीतीनें ती पाण्याची घागर घेऊन तडक घरीं गेली आणि पतीपुढें हात जोडून उभी राहिली.

आपल्या पत्नीनें मनानें का होईना, पण व्यभिचार केला हें जाणून जमदग्नि आपल्या मुलांना म्हणाला, "मुलांनो ! या पापिणीला मारून टाका. पण ज्येष्ठ मुलगा रुमण्वान, सुषेण, वसू, विश्वावसू यांपैकीं कोणीही तें घोर कृत्य केलें नाहीं. तेव्हां जमदग्नीनें त्यांना शाप दिला कीं तुम्ही जड होऊन रहाल.

इतक्यांत शत्रूंचा संहार करणारा राम तेथें आला. तेव्हां जमदग्नीनें म्हटलें, पुत्रा ! तुझ्या या पातकी मातेचा वध कर."

पित्याची ही आज्ञा ऐकतांच रामानें आपला परशु घेतला व तत्काळ मातेचा शिरच्छेद केला.

पुत्राचा हा आज्ञाधारकपणा पाहून संतुष्ट झालेल्या जमदग्नीचा राग शांत झाला व प्रसन्न होऊन त्यानें म्हटलें, "वत्सा ! माझ्या सांगण्यावरून तूं हें मोठें दुष्कर कर्म केलेंस यास्तव तुझ्या मनांत जेवढ्या इच्छा असतील त्या सर्वांचा वर मागून घे."

तेव्हां रामानें म्हटलें, "वध पावलेले सर्व बंधू मातेसह जिवंत व्हावे. मातृवधाच्या पापापासून माझी मुक्तता व्हावी. मला युद्धांत प्रतियोद्धा नसावा व दीर्घ आयुष्य प्राप्त व्हावें." असा मी वर मागतों.

जमदग्नीनें "तथास्तु" म्हटलें.

इकडे सहस्रार्जुनाचे जे मुलगे पळाले होते त्यांना आपल्या पित्याच्या वधाचें वारंवार स्मरण होत होतें. या वैराचा सूड घेण्याची ते संधि पहात होते. पण ते परशुरामाला भीत होते. एकदां परशुराम आपल्या भावांसह अरण्यांत गेला आहे असें पाहून ते

तेथें आले. त्यावेळीं जमदग्नि अग्निगृहामध्यें बसला असून त्यानें आपलें चित्त पुण्यकीर्ति भगवंताकडे लाविलें होतें. कार्तवीर्य पुत्रांनीं त्याच्यावर हल्ला केला व त्याचा निर्दयपणें शिरच्छेद केला. रामाच्या मातेनें – रेणुकेनें – असें न करण्याविषयीं त्यांना दीनवाणीनें सांगून पाहिलें, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. हें क्रूर कर्म करून ते निघून गेले.


पतिनिधनानें रेणुका दुःखी झाली व शोकावेगानें ऊर बडवून आक्रोश करूं लागली. "अरे रामा! याचवेळीं तूं कोठें रे गेलास? अरे लवकर ये, धाव." असें ती वारंवार म्हणूं लागली. थोड्या वेळानें परशुराम तेथें आला. पित्याच्या वधाचा तो प्रकार पहातांच त्याला अनिवार दुःख झालें व तो भयंकर रागावला. त्यानें आपली कुऱ्हाड खांद्यावर टाकली आणि क्षत्रियांचा निःपात करण्याच्या निश्चयानें तो घराबाहेर पडला.

परशुराम प्रथम माहिष्मती नगरीस गेला. तेथें गेल्यावर रामानें कार्तवीर्याच्या सर्व पुत्रांचा संहार केला आणि त्यांचे जेवढे अनुयायी क्षत्रिय होते त्या सर्वांचा नाश करून त्यानें एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केली.

याप्रमाणें क्षत्रिय लोक उन्मत्त होऊन पापकर्म करूं लागले असतां परशुरामानें आपल्या पित्याच्या वधाचें निमित्त करून त्यांचा नाश केला.

कोटिसूर्यप्रतिकाशं विद्युत्पुंजसमप्रभं ।
तेजोराशिं ददर्शाथ जामदग्न्यं प्रतापवान् ॥
नीलमेघनिभं प्रांशुं जटामंडलमंडितम् ।
धनुः परशुपाणिं च साक्षात्कालवांतकम् ।॥
कार्तवीर्यांतकं रामं दृसक्षत्रियमर्दनं ।
प्राप्तं दशरथस्याग्रे कालमृत्यु इवापरम् ॥

★ –अध्यात्मारामायण




रावणासारख्या बलाढ्य राक्षसाच्या भारानें पृथ्वी गांजून गेली असतां त्याचा नाश करण्यासाठीं भगवान विष्णूंनीं जो अवतार घेतला तो सातवा अवतार 'राम' हा होय.

अयोध्येचा राजा दशरथ याची ज्येष्ठ राणी कौसल्या हिच्या पोटीं प्रभु रामचंद्राचा अवतार झाला. विश्वामित्राच्या यज्ञाचे प्रसंगीं त्यानें मारीच आदिकरून मोठमोठ्या राक्षसांचा लक्ष्मणाचें साहाय्य न घेतांही पराभव केला.

सीतास्वयंवरासाठीं उभारलेल्या मंडपांत मोठ्या पराक्रमी वीरांची सभा भरली असतां तेथें शंकराचें भयंकर धनुष्य तीनशें सेवकांनीं ओढीत आणलें. पण प्रभु रामचंद्रानें एखाद्या हत्तीच्या छाव्यानें उंसाचें कांडें मोडावें त्याप्रमाणें तें लीलेनें वर उचलून मोडून टाकलें. याप्रमाणें पण जिंकून त्यानें सीतेची प्राप्ति करून घेतली.

हा समारंभ आटपून तो अयोध्येस जात असतां वाटेंत एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी करणाऱ्या परशुरामाशीं त्याची गांठ पडली. त्यानें परशुरामाचा इतका काळ वाढलेला गर्व नाहींसा केला.

आपल्या पित्याची आज्ञा शिरसावंद्य मानून राज्य, वैभव, प्रेमळ मित्र व राजवाडाही सोडून तो सीतेसह अरण्यांत गेला. तेथें रावणाची बहीण शूर्पणखा दुष्टबुद्धीनें त्याच्याकडे आली असतां त्यानें तिला विद्रूप करविलें.

रामबाण कोणाला सहन होण्यासारखे नव्हते. त्या बाणांनीं त्यानें खर, त्रिशर, दूषण, इत्यादि शूर्पणखेच्या बंधूंसह जनस्थानांतील चौदा हजार राक्षसांचा वध केला. नंतर ही सर्व हकिगत शूर्पणखेनें रावणास जाऊन कळविली.

रावणानें सीतेचा अभिलाष धरून मारीच राक्षसाला हरिणाच्या वेषानें आश्रमाकडे पाठविला. रामानें सीतेच्या सांगण्यावरून त्या हरिणाचा पाठलाग सुरू केला. हरिणानें हुलकावण्या दाखवित रामाला दूर दूर नेलें. शेवटीं रामानें बाण सोडून त्या हरिणाला ठार केलें. इकडे राम गुंतला असतां त्याच्या पाठीमागें सीता एकटीच आश्रमांत आहे असें पाहून त्या दुष्ट राक्षसानें-रावणानें-आश्रमांत जाऊन सीतेला पळवून नेलें.

रावण सीतेला घेऊन चालला असतां जटायूनें त्याला अडविलें, पण त्या झटापटींत तो पक्षी मरण पावला. पुढें राम सीतेचा शोध करीत चालला असतां वानरांचा राजा सुग्रीव याची व रामाची मैत्री जमली. रामानें वालीचा वध करून सुग्रीवाचें गेलेलें राज्य सुग्रीवाला परत मिळवून दिलें. मग सुग्रीवानें रामाला सीतेच्या शोधाच्या कामीं मदत केली.

मारुतीनें सीतेचा शोध केला. त्यानंतर वानरांचें सैन्य घेऊन राम लंकेवर स्वारी करावयास निघाला.

रामासह वानरांचें सैन्य लंकेंत पोहोंचल्यावर रावणानें रामावर कुंभ, निकुंभ, धुम्राक्ष, दुर्मुख, सुरांतक, व नरांतक, इत्यादि राक्षस

पाठविले पण रामानें त्यांचा नाश केला. नंतर प्रहस्त, अतिकाम, विकंपन, इत्यादि राक्षस फार काय स्वतःचा भाऊ कुंभकर्ण व मुलगा इंद्रजित हेही रावणानें रामावर पाठविले, पण त्या सर्वांचा नाश झाला.

याप्रमाणें आपल्या सैन्याचा नाश होऊं लागलेला पाहून रावणाला राग आला आणि स्वतःच विमानांत बसून तो रामाशीं युद्ध करावयास आला. यावेळीं इंद्रानें आपला दिव्य रथ मातलीनामक सारथ्याबरोबर रामाच्या उपयोगासाठीं पाठवून दिला. त्या तेजस्वी रथांत बसून राम आपला प्रभाव दाखवित असतां रावणानें त्याच्यावर तीक्ष्ण बाणांचा प्रहार चालविला. रामानेंही रावणावर बाणांचा नुसता पाऊस पाडला.

राम व रावण यांचें असें भयंकर युद्ध झालें, कीं तसें पूर्वीं कधीं कुणामध्यें झालें नसेल आणि पुढेंही होणार नाहीं.

रामासारख्या धनुर्धारापुढें रावणाचा काय टिकाव लागणार ? रामाच्या बाणानें रावणाचें एक शीर तुटलें. पण काय चमत्कार, लगेच तेथें दुसरें आलें. तेंही रामानें तोडलें तर तिसरें तयार ! असें शंभर वेळां झालें.


अखेर रामानें एक जालिम बाण सोडला तो रावणाच्या छातीवर लागून रावण धाडकन् जमिनीवर कोसळला. अशा रीतीनें एका मोठ्या पापी व खल पुरुषापासून रामानें पृथ्वीचें रक्षण केलें व सज्जनांची सोडवणूक केली.

☆

कालांभोधरकांतिकांतिमनिशं वीरासनाध्यासिनम् ।
मुद्रां ज्ञानमयीं दधनमपरं हस्तांबुजं जानुनि ।
सीतां पार्श्वगतां सरोरुहकरां विद्युन्निभां राघवम् ।
पश्यन्तं मुकुटांगदाहि विविधा कल्पोज्वलांगं भजे ॥

—तंत्रसार

# कृष्णावतार



रामावतार होऊन कांहीं वर्षें लोटल्यानंतर पृथ्वीवर पुन्हा दुष्ट निर्माण झाले. त्यांनीं लोकांना छळावयास सुरुवात केली. लोकांचा द्रव्यापहार करावा, स्त्रियांना भ्रष्ट करावें, ब्राह्मणांना छळावें, यज्ञयागादि कर्मांना प्रतिबंध करावा याप्रमाणें राक्षसांनीं उत्पात मांडला तेव्हां सर्व जनता त्रस्त झाली.

पृथ्वीला हा पापभार सहन होईना. ती ब्रह्मदेवाकडे गेली. मग ब्रह्मदेवासह सर्व देव श्रीविष्णूकडे गेले आणि आपलें गाऱ्हाणें त्यांनीं भगवंताच्या कानांवर घातलें. तेव्हां भगवान म्हणाले, "ब्रह्मदेवा ! मी मथुरेस अवतार घेऊन दैत्यांचा संहार करीन. पापाचा नाश करून पुन्हा धर्माची स्थापना करीन. मला साहाय्यभूत होण्याकरितां तुम्ही पृथ्वीवर जाऊन मनुष्यरूप धारण करा."

मथुरेचा राजा कंस याची देवकी ही बहीण. हिच्या पोटचा आठवा मुलगा तुला ठार करील असें नारदानें कंसाला सांगितलें होतें. तेव्हां कंसानें देवकीचें प्रत्येक मूल मारण्यास सुरुवात केली. अशीं त्यानें

सहा मुलें मारून टाकलीं. देवकीला व वसुदेवाला त्यानें तुरुंगांतच ठेविलें होतें. पुढें श्रावण वद्य अष्टमीला बुधवारीं श्रीकृष्णाचा जन्म झाला असतां हाही मुलगा मारला जाईल या भीतीनें वसुदेवानें गुपचुपपणें या मुलास घेतलें व तो गोकुळास गेला. तेथें नंदाकडे गेला असतां नंदाची बायको यशोदा हिला नुकतीच मुलगी झाली होती. वसुदेवानें ती मुलगी घेतली व कृष्णाला तेथें ठेवलें.

श्रीकृष्ण गोकुळांत वाढूं लागला. कांहीं दिवसांनीं कंसाला ही गोष्ट कळल्यावर त्यानें श्रीकृष्णाला मारण्यासाठीं महाबळ नांवाच्या राक्षसाला ज्योतिषाचा वेष घेऊन पाठविला. त्यानें, " हा मुलगा कुलक्षणी आहे, तरी याला लांब गांवाबाहेर पुरून टाक " असें नंदाला सांगितलें. त्यावेळीं घरांतील पाटा, वरवंटा, मुसळ आदि निर्जीव वस्तु महाबळाच्या अंगार येऊन आदळूं लागल्या. त्याला जीव घेऊन पळतां पळतां पुरेवाट झाली. त्यानंतर पूतना नांवाची राक्षसी आली. आपलें विषारी दूध पाजून श्रीकृष्णाला मारण्याचा तिचा बेत होता. पण श्रीकृष्णानें दूध पिण्याच्या निमित्तानें तिचीं सर्व गात्रें शोषून घेण्यास सुरुवात केली व शेवटीं ती निष्प्रभ होऊन मरण पावली.

पुढें आपल्या नाना प्रकारच्या बाललीलांनीं श्रीकृष्णानें गोकुळवासी गोपगोपींना सुखी केलें. यमुना नदींत कालिया नांवाचा भयंकर विषारी सर्प रहात होता. त्याच्या विषानें गोपाळ-गाई-वासरें मरून पडलीं तेव्हां श्रीकृष्णानें डोहांत उडी घालून त्या नागाला ठार केलें.

इकडे कंसानें श्रीकृष्णावर अघ, केशी, व्योमासूर, वगैरे दैत्य पाठविले. पण कृष्णानें त्या सर्वांचा नाश केला असें पाहून कंसाच्या मनांत भीति उत्पन्न झाली. आतां कपटानें श्रीकृष्णास मथुरेस आणावा व त्याचा वध करावा असा त्यानें बेत केला. त्यानें श्रीकृष्णाला मथुरेस आणण्यासाठीं अक्रुरास पाठविलें.

बलराम व कृष्ण कंसाच्या यज्ञमंडपांत पोहोंचले. कृष्णानें लगेच यज्ञधनुष्याचा भंग केला हें पाहून कंस घाबरला व त्यानें कुवलया-

पीड नांवाचा हत्ती कृष्णाच्या अंगावर सोडला; पण कृष्णानें त्याला सहज लीलेनें ठार केलें. मग चाणूर व मुष्टिक हे मल्ल अंगावर सोडले. त्यांनाही कृष्णानें चीत केलें. आतां कृष्ण सिंहासनाच्या रोखानें निघाला. त्यानें कंसाला सिंहासनावरून खालीं ओढलें आणि त्याला आडवा घालून छातीवर ठोसे मारून त्याचा प्राण घेतला. त्यानंतर स्वतः राज्यावर न बसतां कृष्णानें मथुरेचें राज्य उग्रसेनास दिलें व आपण मथुरेंतच राहूं लागला.

जरासंध हा कंसाचा सासरा. त्यानें जांवयाच्या वधाचा सूड घ्यावा म्हणून कृष्णावर एकंदर सतरा स्वाऱ्या केल्या; पण त्या सर्व कृष्णानें परतविल्या. शेवटीं हा त्रास चुकविण्यासाठीं कृष्णानें अवघड ठिकाणीं समुद्रांत द्वारका नगरी वसविली व तेथें तो यादवांसह राज्य करूं लागला.

कुंडिनपूरच्या भीष्मक राजाला रुक्मिणी नांवाची एक सुंदर कन्या होती. श्रीकृष्णाच्या रूपगुणांची कीर्ति तिच्या कानांवर गेली तेव्हां तिनें कृष्णासच वरण्याचा निश्चय केला. तिचा भाऊ रुक्मी ह्याला हें आवडलें नाहीं. त्याच्या मनांतून चेदी देशाचा राजा शिशुपाल याला रुक्मिणी द्यावयाची होती. म्हणून त्यानें म्हटलें, " रुक्मिणीचें स्वयंवर करतों; हवे असल्यास श्रीकृष्णानें पराक्रम गाजवून रुक्मिणीला न्यावी. त्यावेळीं कोण पराक्रमी तें ठरेल. "

श्रीकृष्णानें रुक्मिणीस पळवून नेलें असतां त्यावर चाल करून गेलेले शिशुपाल, वक्रदंत व रुक्मि हे पराभव पावले आणि भीमकानें कृष्ण-रुक्मिणीचा विवाह थाटानें पार पाडला. त्यानंतर श्रीकृष्णानें सत्यभामा, जांबुवंती, वगैरे इतर सात स्त्रियांशीं लग्नें केलीं. नरकासुर नांवाच्या राजानें अनेक राजांना जिंकून त्यांच्या मुली बंदींत टाकल्या होत्या. त्यांची श्रीकृष्णानें सोडवणूक केली असतां त्यांनीं श्रीकृष्णासच वरलें.

आपलें सार्वभौमत्व सिद्ध करण्यासाठीं धर्मराजानें राजसूय यज्ञ केला. त्यावेळीं अग्रपूजेचा मान श्रीकृष्णास दिला. ही गोष्ट

शिशुपालादि दुष्टांस आवडली नाहीं. त्यांनीं भरसभेंत श्रीकृष्णाचा अपमान केला. तेव्हां त्याचे शंभर अपराध भरलेले पाहून श्रीकृष्णानें शिशुपालास ठार मारलें. यानंतर धर्मराजाचा निरोप घेऊन तो द्वारकेस गेला असतां पौंड्रक आणि वक्रदंत यांनीं शिशुपालाच्या वधाचा सूड घेण्यासाठीं द्वारकेला वेढा घातलेला दिसला लगेच श्रीकृष्णानें सुदर्शन सोडून त्या दोघांचा वध केला.

श्रीकृष्णानें अशा प्रकारें पराक्रम करून अनेक दैत्यांना ठार मारलें आणि भूभार हरण केला. नंतर आपलें अवतारकृत्य समाप्त झालें असें समजून यापुढें हातीं शस्त्र धरणार नाहीं असा निश्चय केला.

पुढें कौरव-पांडवांमध्यें वैर उत्पन्न झालें आणि भारतीय युद्धाचा प्रसंग आला तेव्हां कृष्णानें अर्जुनाचें सारथ्य पत्करलें. दोन्ही सैन्यें युद्धासाठीं समोरासमोर ठाकलीं असतां ऐन वेळीं अर्जुन शस्त्र खालीं ठेवून बसला. आपणांस राज्य मिळावें म्हणून स्वजनांचा घात करण्याचें पातक आपल्या हातून घडणार हें फार मोठें पाप आहे असें अर्जुनास वाटलें आणि आपण युद्ध करणार नाहीं असें तो म्हणाला. अशा वेळीं श्रीकृष्णानें त्याला अनेक प्रकारचें ज्ञान सांगून त्याचा मोह दूर केला व त्याला युद्धास प्रवृत्त केलें. श्रीकृष्णार्जुनाच्या या संवादाला भगवद्गीता असें म्हणतात. शेवटीं या लढाईंत पांडवांस जय मिळाला.

अशा रीतीनें दुष्ट कौरवांच्या संहारानें पृथ्वीवरील पाप नाहींसें झालें. शेवटीं श्रीकृष्णाला मुसळाचें अग्र लावलेला बाण एका व्याधानें अज्ञानानें मारला आणि तें निमित्त करून श्रीकृष्ण निजधामास निघून गेले.

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।
देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥




नेपाळच्या दक्षिणेकडील तराईच्या प्रदेशांतून वहाणाऱ्या रोहिणी नदीच्या तीरावर कपिलवस्तु नांवाचें नगर होतें. शुद्धोदन नांवाचा शाक्य लोकांचा राजा या नगरावर राज्य करीत होता. त्याची राणी मायादेवी ही माहेरीं जात असतां वाटेंत लुंबिनी नांवाच्या बागेंत ती प्रसूत झाली. तिला एक सुलक्षणी मुलगा झाला त्याचें नांव सिद्धार्थ. हाच पुढें गौतम बुद्ध या नांवानें प्रसिद्ध झाला.

सिद्धार्थ राजपुत्र असल्यामुळें त्याचें बाळपण मोठें लाडांत गेलें. पुढें वयाच्या एकोणिसाव्या वर्षी यशोधरा नांवाच्या सुस्वरूप राजकन्येशीं त्याचा विवाह झाला. परंतु सिद्धार्थाचें मन ऐहिक सुखांत कधींच रमलें नाहीं. इहलोकामध्यें भोगाव्या लागणाऱ्या, दारिद्र्य ऐहिक दुःखें वगैरेमुळें होणारे मानवी हाल पाहून त्याचें अंतःकरण तिळतिळ तुटे. या दुःखापासून मानवांची मुक्तता कशी होईल या विचारानें त्याच्या मनांत काहूर उठे.

एकदां रथांत बसून चालला असतां, केवळ अस्थिपंजर असा एक म्हातारा मनुष्य; पुढें कांहीं अंतरावर रस्त्याच्या एका कडेला कण्हत पडलेला एक निराश्रित भिकारी; नंतर एक प्रेत हीं त्याच्या

त्याला शस्त्रें वापरण्याची कला अवगत होईल. एक असाधारण तलवार, वायुवेगानें संचार करणारा अश्व आणि सर्व प्रकारचें ज्ञान असणारा शुक शंकराकडून त्याला प्राप्त होईल.

यानंतर यथाकालीं कलंकीचा विवाह पद्मार्शी होईल आणि मग जगांतील अधर्मियांचा नाश करण्यासाठीं तो घराबाहेर पडेल. पहिल्यानें किकटावर स्वारी करून बुद्धाच्या देशांतील राजा जिन याचा तो संहार करील. यानंतर कलंकीची म्लेंच्छावर स्वारी होईल. त्यांचा पराभव केल्यावर कुठोदरी या राक्षसिणीशीं त्याचें युद्ध होईल. तिचा नाश केल्यावर शक, कांबोज, सबरस आणि भल्लातांचा राजा शशिध्वज यांच्याशीं कलंकीचें युद्ध होईल. या युद्धांत शशिध्वजाची गदा लागून तो बेशुद्ध होईल. व त्याला राजवाड्यांत नेण्यांत येईल. तेथें शशिध्वजाची राणी सुशांत ही कलंकीचें खरें स्वरूप ओळखून त्याच्याशीं सख्य करण्याचा आपल्या नवऱ्यास सल्ला देईल. त्याप्रमाणें कलंकीशीं मैत्री करून राजा त्याला आपली मुलगी रमा ही अर्पण करील.

मग कलंकी तेथून निघून चित्ररथ गंधर्वाची बायको सुलोचना हिची शापांतून मुक्तता करून तिला स्वर्गप्राप्ति करून देईल. तेथील कंचना नगरीवर महामतीची स्थापना करील. पुढें सूर्यकेतूला अयोध्येच्या गादीवर देवापीला वारणावतावर स्थापन करून कलंकी पुन्हां चंबळपुरास येईल.

आपल्या पराक्रमानें सर्व पृथ्वीवर सुख आणि समृद्धी यांची स्थापना करून तेथें सत्ययुगासारखी घडी बसवील. त्यानंतर हिमालयावर जाऊन पवित्र नदीचे कांठीं तो अवतार विसर्जन करील.

सजलजलददेहो वातवेगैकवाहः ।
करधृत करवालः सर्व लोकैकपालः ।
कलिकुलबलहंता [illegible]
कलयतु कुश [illegible]

IRBK-0105697